संशोधन आराखडा (संशोधनाची रूपरेषा - Synopsis)

संशोधन विषय : “स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास”
(इ.स. १९४७ ते इ.स. २०००)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानव्यविदया शाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच. डी. या पदवीसाठी सादर करण्यात

येणारा संशोधनपर आराखडा

संशोधक विद्यार्थी
अनिल महादेव बोराडे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
प्र. व्दा. कारखानीस कला व वाणिज्य महाविद्यालय,
अंबरनाथ, जि. ठाणे - ४२१ ५०१

संशोधक मार्गदर्शक
डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी
इतिहास विभाग प्रमुख,
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड
देगलूर, जि. नांदेड - ४३१७१७

(शैक्षणिक वर्ष : २०१८ - २०१९)

संशोधन आराखडा (संशोधनाची रूपरेषा - Synopsis)

संशोधन विषय :- "स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास" (इ.स. १९४७ ते इ.स. २०००)

I) प्रस्तावना
II) संशोधन विषयाची उद्दिष्टये
III) संशोधन विषयाची आवश्यकता
IV) संशोधनाची गृहीतके
V) संशोधन पद्धती
VI) प्रकरणांची वर्गवारी
VII) संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा
VIII) आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा (संशोधन विषयाचे वेगळेपण)
IX) संशोधन विषयाचे महत्व
X) संदर्भ सूची

संशोधक विद्यार्थी
अनिल महादेव बोराडे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
प्र.व्दा. कारखानीस कला व वाणिज्य महाविद्यालय,
अंबरनाथ, जि. ठाणे - ४२१ ५०१.

संशोधक मार्गदर्शक
डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी
इतिहास विभाग प्रमुख
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड
देगलूर, जि. नांदेड - ४३१ ७१७.

I) प्रस्तावना :

प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन अशा विविध कालखंडात विविध भूप्रदेशांच्या भागाचे इतिहास लिहिलेले आहेत. या लेखनामध्ये खेडेगाव, शहर, जिल्हा यांचा विचार होताना दिसत नाही. एका विशिष्ट काळाची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, व औद्योगिक अशा अनेक अंगांनी आणि विशिष्ट भौगोलिक सीमित भागापुरता इतिहास सहजा सहजी लिहिला जात नाही. अलीकडे इतिहास लेखन करताना स्थानिक इतिहासाला जास्त महत्व आले आहे. अलीकडच्या काळात आपल्या देशात स्थानिक इतिहासाची गरज वाढत आहे. आज जागतिक पातळीवर इतिहासाच्या अभ्यासाला अनन्य साधारण महत्व आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

२० व्या शतकाच्या मध्यानंतर ठाणे जिल्ह्यामध्ये प्रचंड परिवर्तन घडून आले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ठाणे जिल्ह्याचा व शहराचा चेहरा मोहरा पूर्णपणे बदलेला दिसून येतो. नागरिकीकरण, औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण, दळणवळण, प्रसारमाध्यमे यामुळे स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर ठाणे जिल्ह्याचा कायापालट झाला.

प्रस्तुत संशोधनात अभ्यासाचा विषय "स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास" एवढा मर्यादित आहे. तसेच ठाणे जिल्ह्याची उत्पत्ती, प्राचीन स्वरूप, ऐतिहासिक पार्श्वभूमी कशी होती. 'ठाणे जिल्ह्यातील शॉपिंग मॉल्स', 'मत्स्यव्यवसायाचा आर्थिक अभ्यास', 'दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक', 'आदिवासी विकासातील शासकीय व अशासकीय योजना', 'लघु उद्योग क्षेत्रातील महिला उद्योजकांचा अभ्यास', 'आदिवासी जमातींचा अभ्यास' तसेच 'प्राचीन ठाणे परिसर अभ्यास' या सर्व विषयांचा अभ्यास केलां मात्र देश स्वतंत्र झाल्यानंतर ठाणे शहराचे बदलते स्वरूप काय होते ? त्याचा विकास कसा झाला ? स्वरूपामध्ये इ. स. २००० साला पर्यंत कसे बदल होत गेले ? या विषयी अभ्यास झालेला दिसून येत नाही म्हणून " स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास " (इ.स.१९४७ - इ.स.२०००) या विषयी संशोधन करणे आवश्यक वाटल्यामुळे असा प्रबंधाचा विषय निवडला आहे.

II) संशोधन विषयाची उद्दिष्टये :

१) ठाणे शहराचे भौगोलिक स्थान अभ्यासणे.
२) ठाणे जिल्ह्याची व शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.
३) ठाणे जिल्ह्याचा व शहराचा उगम त्यामागील उद्देश स्पष्ट करणे.
४) ठाणे शहरातील प्रशासकीय संस्थांचे कार्य व भूमिका समजून घेणे.
५) ठाणे जिल्ह्यातील सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, व शैक्षणिक इतिहास अभ्यासणे.
६) जागतिकीकरणाचे ठाणे शहरावरील झालेले परिणाम अभ्यासणे.

III) संशोधन विषयाची आवश्यकता :

सबंधित साहित्याचे सिंहावलोकन केले असता असे दिसून आले कि ठाणे जिल्हा व परिसर या विषयी फारच कमी प्रमाणात संशोधन झालेले आहे. म्हणूनच “स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास” संशोधन हाती घेण्यात आले आहे.

IV) संशोधनाची गृहीतके :

१) स्वातंत्र्य पूर्व काळात विविध शहरातील क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. त्यामध्ये ठाण्यातील क्रांतिकारकांचा अंतर्भाव होता. तेव्हा या चळवळी मध्ये त्यांनी महत्वपूर्ण कामगिरी केली होती.

२) ठाणे शहरात स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय परिस्थितीतील परिवर्तनातून अनेक सुधारणा घडून आल्या.

३) ठाणे शहरात विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून धर्म व समाज सुधारणेसाठी सामाजिक संस्था व धर्म, समाज सुधारकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे तेथे धार्मिक सलोखा जाणवतो.

४) ठाणे शहरातील मंदिरे, मूर्तीकला, तलाव, यातून प्राचीन कलात्मक माहिती मिळते.

५) ठाणे शहरातील लोकजीवन हे सुसंस्कृत व मध्यम प्रतीचे असून ठाण्यातील कला वैभव संपन्न होती.

६) समकालीन नेत्यांनी ठाणे शहराला दिलेल्या भेटीनंतर व्यक्त केलेल्या अभिप्रायातून ठाणे शहराच्या विकासाची दिशा स्पष्ट होते.

७) ठाणे शहरात परदेशी व देशांतर्गत चाललेल्या व्यापार उदिमांमुळे ठाणे जिल्हा आर्थिक दृष्ट्या संपन्न होता.

८) जागतिकीकरणाच्या प्रवाहात आल्याने ठाणे शहराचा विकास घडून आला.

V) संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनात ऐतिहासिक संशोधनपद्धतीचा वापर करण्यात येईल. प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेण्यात येईल. प्रस्तुत संशोधनाच्या पाठीशी असलेल्या सैद्धांतिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी सर्वेक्षण, वर्णनात्मक, किंवा गुणात्मक पद्धती, विश्लेषणात्मक पद्धती, कालक्रमिक, समाजाशात्रीय, चिकित्सक अभ्यास पद्धतीचा उपयोग करता येईल. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर मुंबई मराठी ग्रंथालय, प्राच्य विद्या संशोधन केंद्र या ग्रंथालयात जाऊन तेथील उपलब्ध ग्रंथांचा अभ्यास करण्यात येईल.

VI) प्रकरणांची वर्गवारी :

प्रकरण १ ले : ठाणे जिल्ह्याची व शहराची उत्पत्ती, विकास, जडणघडण आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी

ठाणे शहराला फार मोठी ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. ठाणे हे मुंबईच्या उत्तरेकडे वसलेले आहे. ठाणे शहराचे क्षेत्रफळ १४७ वर्ग कि. मी. आहे. ठाणे शहराला तलावांचे शहर असेही म्हणतात. निसर्ग संपन्न ठाणे शहराचा इतिहास ही तितकाच नावाजलेला आहे. शिलाहार काळात ठाणे जिल्हाचे वैभव अतिउच्च शिखरावर पोहचले होते. इ. स. ९ व्या शतकापासून ते

१३ व्या शतकापर्यंत श्रीस्थानक उत्तर कोकणाच्या राजधानीचे शहर होते. ठाण्याचे पूर्वीचे नाव श्रीस्थानक होते.

ठाणे शहर हे अत्यंत जुने शहर आहे. ह्या शहरात मध्ययुगीन काळातील शिलालेख आणि ताम्रपट आढळून आलेले आहेत. हे शहर शिलाहार राजांची राजधानी होते. इटालियन प्रवासी मार्कोपोलोने इ.स.१२९० मध्ये ठाण्याला भेट दिली. ठाणे हे सुंदर असल्याचा उल्लेख करतो. तसेच ठाणे हे मोठे बंदर असून तेथील व्यापारी, कापूस, ताग, आणि चामडे विकतात आणि घोडे खरेदी करतात असे म्हणतो.

पोर्तुगीजांचे ठाणे शहरात इ. स. १५३० मध्ये आगमन झाले आणि त्यांनी शहरावर इ. स. १७३९ पर्यंत सुमारे २०० वर्षे राज्य केले. मराठ्यांनी या शहरावर इ. स. १७३९ ते १७८४ पर्यंत राज्य केले. इ. स. १७८४ पासून स्वातंत्र्यापर्यंत ठाणे शहर इंग्रजांच्या ताब्यात होते. भारतातील पहिली रेल्वे बोरीबंदर (मुंबई) ते ठाणे इ. स. १८५३ मध्ये धावली. स्वातंत्र्य प्राप्ती नंतरही या शहराने आपली स्वतंत्र ओळख बनविली आहे. या दृष्टीने ठाणे शहराचा अभ्यास महत्व पूर्ण ठरणार आहे.

ठाणे शहराची भौगोलिक परिस्थिती

सुपीक जमीन, दमट हवा हा विस्तृत समुद्रकिनारा वाऱ्यावर डोलणारी भात शेती यामुळे ठाणे परिसर नितांत सुंदर, रमणीय व विलोभनीय आहे. ठाण्याच्या उत्तरेला दादरा नगर हवेली, नाशिक आणि अहमद नगर, आग्नेय दिशेला पुणे, दक्षिणेला कुलाबा, आणि नैऋत्याला ग्रेट मुंबई अशा या ठाणे जिल्ह्याच्या सीमा आहेत. ठाणे जिल्हा ९५३३.०० चौरस मीटर एवढा विस्तृत आहे. ठाणे जिल्ह्याला विस्तृत असा कोकण किनारा लाभला आहे. खाडीच्या किनारपट्टीचा विकास ठाणे परिसरातील मुळ रहिवासी कातकरी, ठाकर, डोंगर कोळी, भोई, भंडारी, व आगरी या जमातीने केला. नाचणी, कुळीथ, तांदूळ, वरई, हि मुख्य पिके आहेत.

ठाणे शहर हे भारतातील सर्वात दाट लोकवस्ती असलेल्यां महानगरापैकी एक आहे. ठाणे जिल्ह्यातील सात तालुक्यांपैकी ठाणे शहर एक तालुका आहे. तसेच ते त्या जिल्ह्याचे मुख्यालय ही आहे. सुमारे १४७ चौरस किलोमीटर (५७ चौरस मैल) जमिनीच्या स्तरावर विस्तारित १,८४१,४८८ लोकसंख्या असलेले ठाणे शहर भारतातील १६ व्या क्रमांकाचे शहर आहे.

प्रकरण २ रे : ठाणे शहरातील प्रशासन व्यवस्था

ठाणे जिल्ह्याचा मुख्य आधार प्रशासन आहे. ठाणे जिल्हा हे कारभाराचे मुख्य ठिकाण असल्यामुळे येथे विविध पातळीवरील कार्यालयाची स्थापना झालेली आहे. ठाणे शहराचा विचार करता जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस कार्यालय, जिल्हा न्यायालय, जिल्हा परिषद, जिल्हा रुग्णालय, समाजकल्याण कार्यालय, सेवा योजना कार्यालय, विविध जिल्हा सहकारी प्रमुख संस्था, दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मुख्यालय, पारपत्र कार्यालय इ. प्रमुख कार्यालयांचा समावेश ठाणे शहरात आहे. साहजिकच जिल्ह्याच्या विकासा मध्ये या संस्थाचे महत्वाचे योगदान आहे. शासकीय, निमशासकिय, खाजगी, प्रशासन व्यवस्थाच्या भाऊगर्दीमुळे गेल्या तीस वर्षात मोठ्या प्रमाणात बदल होत गेले आहेत.

प्रकरण ३ रे : ठाणे शहरातील सामाजिक व सांस्कृतिक चळवळी

ठाणे शहराच्या व जिल्ह्याच्या इतिहासाला विविध अंगे आहेत. एक सृजनात्मक वारसा लाभलेले शहर म्हणून ठाण्याचा उल्लेख करावा लागेल. येथे अनेक तत्वचिंतक, इतिहासकार, साहित्यिक, पत्रकार, कवी, नाटककार, संगीतकार क्रीडापटू जन्माला आले. ठाण्याला महाराष्ट्राची सांस्कृतिक उपराजधानी म्हणतात. गणेशोत्सव, दहीहंडी आणि नवरात्र हे ठाण्यातील मुख्य उत्सव आहेत. ठाण्यातील गडकरी रंगायतन विविध नाटके आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे माहेघर आहे. इंद्रधनु ची स्थापना २ ऑक्टोबर १९८७ मध्ये गोविंद साठे, नारायण काळे, मुकुंद मराठे, अजित गुर्जर, अजित परांजपे, मुकुंद चौगुले, रवींद्र अमृतकर, शिशीर जोग, गिरीश प्रभू, संजय मांजरेकर, महेश वर्दे, अतुल जोशी, क्षितीज दाते, इ. नी केली. संगीतकार अनिल मोहिले यांच्या ‘सप्तसूर माझे’ या कार्यक्रमांची सुरुवात इथेच झाली. जेष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूरकर यांनी ठाण्यातच त्यांची पहिली मैफल इंद्रधनूच्या व्यासपीठावर सादर केली. अशा कितीतरी व्यक्तींचा ठाण्याच्या सामाजिक व सांस्कृतिक जडण घडणीत सिंहाचा वाटा आहे. सामाजिक सांस्कृतिक चळवळीची माहिती, विविध स्वातंत्र्योत्तर काळातील चळवळी, संस्था, ट्रस्ट, वृत्तपत्रे, साहित्यिक प्रगती, संमेलने, वाचनालय, संगीतकला, नाट्यसंस्था, सिनेक्षेत्रे, क्रीडाक्षेत्रे इ. माहिती मिळविताना ठाणे शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक वैभव लक्षात येते.

प्रकरण ४ थे : ठाणे शहरातील शैक्षणिक परिस्थिती

ठाणे शहराची व जिल्ह्याची शैक्षणिक परंपरा फार पुरातन आहे. शैक्षणिक पार्श्वभूमी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक, महाविद्यालये, तसेच ठाणे शहराच्या नाव लौकिकामध्ये भर घालणाऱ्या संस्था यांच्या शैक्षणिक विकासाचा आढावा घेणे. तंत्र शिक्षणाचा मोठा वारसा या शहराला आहे. समाजकारण आणि राजकारण या क्षेत्रात इथल्या शैक्षणिक परंपरेने मोठे योगदान सिद्ध केले आहे. त्यामुळे हा ही अभ्यास मोठे संचित देणारा ठरेल.

प्रकरण ५ वे : ठाणे शहरातील आर्थिक परिस्थिती

ठाणे हे जिल्ह्याचे व तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे येथे विविध प्रकारच्या जिल्हा व तालुका पातळीवरील प्रशासकीय कार्यालयाची स्थापना झालेली आहे. शहरातील सेवा क्षेत्रातील रोजगाराच्या प्रमाणामध्ये औद्योगिक वसाहत, शासकीय कार्यालये, शिक्षण, आरोग्य संस्था, व्यापार, कृषी उत्पन्न बाजार समिती, करमणूक, वाहतूक, बँका, दुकाने, फेरीवाले, मॉल, पारपत्र कार्यालय इ. मुळे लक्षणीय वाढ झाली आहे. शहराच्या आर्थिक आधाराची संकल्पना औद्योगिक आणी वाणिज्य प्रकारच्या कार्यावर अवलंबून आहे.

प्रकरण ६ वे : ठाणे शहरातील धार्मिक परिस्थिती

ठाणे जिल्ह्यात मूळ आदिवासींचे सण, उत्सव, जत्रा, धार्मिक परंपरा, देवी-देवता, मंदिरे, मठ यांचा धावता आढावा घेऊन स्वातंत्र्योत्तर ठाणे शहरातील धार्मिक जीवन निरनिराळ्या देव – देवतांची होत असणारी उपासना, तसेच उपासना पद्धती, कोणकोणत्या होत्या यांचा अभ्यास करणार आहे.

प्रकरण ७ वे : जागतिकीकरणाचा ठाणे शहरावरील परिणाम

स्वातंत्र्यानंतर जागतिकीकरणाचा ठाणे शहरावर महत्वाचा असा परिणाम घडून येऊन मॉल संस्कृती, मोनो रेल्वे, मेट्रो रेल्वे, आधुनिक औद्योगिक पद्धती, पाश्चात्य राहणीमान, पाश्चात्य पिझ्झा - बर्गर इ. याचा ठाणे शहरातील लोकांवर झालेला परीणाम याची सविस्तर माहिती या प्रकरणात घेण्याचा मानस आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाने या शहराला बऱ्याच गोष्टी प्रदान केल्या आहेत. रोजगाराच्या अनेक संधी ह्या शहराने उपलब्ध करून दिल्या आहेत.

प्रकरण ८ वे : उपसंहार

नगरांचा विकास ही एक चालत राहणारी प्रक्रिया आहे, ती प्रक्रिया ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, पर्यावरणीय, वास्तवाशी निगडीत असते. प्रस्तूत संशोधनात "स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास" यामध्ये वरील घटकांचा शहराच्या नागरी अभ्यासासाठी परस्पराशी सबंध आहे, हे दिसून आले. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, परिवर्तने ठाणे शहरामध्ये घडत राहिली. कारखाने उद्योगधंदे तसेच शहराच्या भोवताली वसाहती वाढत चालल्या आहेत. शहराचे प्रश्न सोडविण्यासाठी आरोग्य, शिक्षण, पाणी पुरवठा, उद्योगधंदे, प्रदूषण यांच्या उपाययोजनांची गरज आहे.

प्रस्तूत प्रकरणात संशोधनानंतर आढावा घेऊन विषया नुरूप योग्य ते निष्कर्ष सादर करण्यात येतील.

VII) संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ठाणे जिल्ह्यात अनेक बदल झाले मात्र संशोधन अभ्यासाच्या विषयाची व्याप्ती स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहर एवढीच मर्यादित राहणार असून, याच प्रदेशातील अभ्यासकालीन संशोधन विषयानुरूप राहील. 'स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास' हा विषय व्यापक असल्याने त्याचे भौगोलिक स्थान, ऐतिहासिक पार्श्वभूमी, ठाणे शहरातील प्रशासकीय संस्थांचे कार्य व भूमिका, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, व शैक्षणिक इतिहास, जागतिकीकरणाचे पडसाद या विविध पैलुंचा अभ्यास करण्यात येईल.

संशोधन विषयाचा परीघ स्वातंत्र्योत्तर ठाणे शहरा पुरता मर्यादित असल्याने सहाजिकच या अभ्यासाला मर्यादा आहेतच. परंतु सबंधित विषयाला परिपूर्णता येण्यासाठी आवश्यक तिथे विस्तारासाठी संदर्भाचा वापर करण्यात येईल.

VIII) या विषयावर आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा :

प्रस्तुत विषयाचे संशोधन करत असताना संशोधनाची दिशा ठरविण्यासाठी ठाणे जिल्हा व आसपासच्या परिसरावर आजवर झालेल्या संशोधनामध्ये "जागतिकीकरण, मुक्त अर्थ व्यवस्था आणि खाजगीकरणाच्या प्रभावातून निर्माण झालेल्या बहुदुकानीय (शॉपिंग मॉल्स) संस्कृती विपणन व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास - विशेष संदर्भ ठाणे जिल्हा", "महाराष्ट्रातील सहकारी

क्षेत्रातील मत्सव्यवसायाचा आर्थिक अभ्यास - विशेष संदर्भ ठाणे जिल्हा", "ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात दि - ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. च्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास", "आदिवासी विभागातील उदयोजगता विकास आणि शासकीय व अशासकीय योजनाचा अभ्यास - विशेष संदर्भ ठाणे जिल्हा", "लघुदयोग क्षेत्रातील महिला उदयोजकांचा अभ्यास - विशेष संदर्भ ठाणे जिल्हा", "ठाणे जिल्ह्यातील आदिवासी जमातीचा सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक इतिहास एक अवलोकन" इ. विषयावर आजवर झालेल्या संशोधनामध्ये संशोधन करण्यात आले आहे.

IX) संशोधन विषयाचे महत्व :

इतिहास लेखनामध्ये भारताच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक इतिहासावर लेखन करणाऱ्यांची संख्या आधिक आहे. ठाणे जिल्ह्याचा व शहराचा ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, प्रशासकीय, आर्थिक इतिहास, अभिमान आणि गौरवास्पद आहे. देशातील या राजकीय सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात महाराष्ट्रातील क्रांतिकारकांनी महत्वाची भूमिका पार पाडली. त्यामध्ये ठाणे शहरातील क्रांतिकारकांनी सहभाग घेऊन आपले महत्वाचे योगदान दिले आहे. त्याशिवाय या काळात महाराष्ट्रामध्ये ज्या सामाजिक व सांस्कृतिक सुधारणा राबविल्या. गेल्या त्यावरही ठाणे शहराने सहभाग नोंदविला आहे. स्वातंत्र्या नंतर महाराष्ट्रात ज्या राजकीय व सामाजिक घडामोडी घडल्या त्यांचे हि पडसाद ठाणे शहरावर पडल्याचे दिसून येतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास हा संशोधनाचा नाविन्यपूर्ण विषय असून या विषयावर संशोधन झालेले नाही. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे. या संशोधनामुळे स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ठाणे शहराचा ऐतिहासिक अभ्यास करण्याचा मानस आहे.

X) संदर्भ सूची :

परिशिष्टे :

१.प्राथमिक साधने :

अष्टाध्यायी (पाणिनीकृत)

अमरकोश (अमरसिंहकृत)

२.गॅझेटीअर :

गॅझेटीअर ऑफ बॉम्बेप्रेसिडन्सी (ठाणे जिल्हा)

महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, महाराष्ट्र : इतिहास - प्राचीन काळ (खंड-१, भाग-२)

महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर - ठाणे जिल्हा : प्रकाशन वर्ष १९८२

महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, महाराष्ट्र : इतिहास - प्राचीन भारत (खंड-१, खंड-२) प्रकाशन वर्ष १९६७

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ : मराठी विश्वकोश

मुंबई राज्याचे गॅझेटीअर, १९८२ ची नवी आवृत्ती,पुस्तक १२.

३. दुय्यम साधने :

खोबरेकर वि.गो.(१९६९). कोकणच्या इतिहासाची साधने.

जोशी पुरोषोत्तम बाळकृष्ण. उत्तर कोकणचा प्राचीन इतिहास

दळवी दाउद (२०१०). असे घडले ठाणे, ऐरोली : श्रीकृपा प्रकाशन.

मोदक जनार्धन बाळाजी (१८९१). ठाणे जिल्ह्याचे वर्णन, रामकृष्ण बडे यांनी ठाणे येथे अरुणोदय छापखान्यात प्रसिद्ध केले,

घाटोळे रा. ना (२००३). समाज शास्त्रीय संशोधन-तत्वे व पद्धती (आठवी आवृत्ती), नागपूर : श्री मंगेश प्रकाशन,

पाटील वा. भा (१९९९). संशोधन पद्धती, नागपूर : मंगेश प्रकाशन.

सातभाई श्रीनिवास (२०११). इतिहास लेखनशास्र (प्रथम आवृत्ती), औरंगाबाद : विद्याबूक प्रकाशन.

४) वृत्तपत्रे :

विशेषांक : : ठाणे सत्ता, विशेष दिवाळी अंक २००३, संपादक - विलास मोरे

५) ग्रंथालये, मुलाखती व ग्रंथलेखन संदर्भात उपयुक्त ठरेल अशी सामुग्री वापरण्यात येईल.

संशोधक विद्यार्थी

अनिल महादेव बोराडे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
प्र.व्दा. कारखानीस कला व वाणिज्य महाविद्यालय,
अंबरनाथ, जि. ठाणे - ४२१ ५०१.

संशोधक मार्गदर्शक